**जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ट योगदान देणा-या जिल्हा- तालुका- गाव यांना पुरस्कार देणेबाबत .**

# महाराष्ट्र शासन

**ग्राम विकास व जलसंधारण विभाग,**

**शासन निर्णय क्र. मफुअ-२०१३ /प्र. क्र. ३७ /जल-८**

मंत्रालय , मुंबई -४०००३२

**दिनांक : २८ सप्टेंबर, २०१६.**

वाचा :

ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक

| | |
|---|---|
| (१) जलसं-२००२/प्र.क्र.५८१/जल-७, | दिनांक २८ फेब्रुवारी, २००२. |
| (२) जलसं-२००२/प्र.क्र६७०/जल-७, | दिनांक २९ नोव्हेंबर, २००२. |
| (३) जलसं-१००३/प्र.क्र .७९/जल-८, | दिनांक १८ जून, २००३. |
| (४) जलसं-२००८/प्र.क्र.३१/जल-८, | दिनांक १० सप्टेंबर, २००८. |
| (५) जलसं-२००८/प्र.क्र.३१/जल-८, | दिनांक २० फेब्रुवारी, २००९. |
| (६) जलसं-२०११/प्र.क्र.१६ /जल-८, | दिनांक ३० मार्च, २०११. |
| (७) जलसं-२०११/प्र.क्र.६५ /जल-८, | दिनांक ०३ फेब्रुवारी, २०११. |
| (८) शुध्दीपत्रक -२०११ / प्र.क्र.६५ / जल-८, | दिनांक ०७ मार्च, २०१२. |
| (९) मफुअ २०१३ / प्र.क्र. ३७ / जल-८, | दिनांक १६ डिसेंबर, २०१३. |
| (१०) मफुअ २०१४ / प्र.क्र. ५४ / जल-८, | दिनांक ११ ऑगस्ट, २०१४. |
| (११) जलअ-२०१४/प्र.क्र.२०३/जल-७ | दिनांक ५ डिसेंबर, २०१४. |

**प्रस्तावना :**

राज्यातील ग्रामीण भागातील जल व भूमी संधारण, पडीक जमीन विकास, वृक्ष लागवड इत्यादी नैसर्गिक साधन संपत्तीत सुधारणा व वाढ करण्याच्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयसेवी संस्था तसेच ग्रामीण भागातील जनतेचा लोक सहभाग या माध्यमाद्वारे महात्मा ज्योतिबा फुले जल व भूमी संधारण अभियान दिनांक १ मे, २००२ पासून संदर्भाधीन दिनांक २८ फेब्रुवारी, २००२ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यास सुरूवात झाली. जलसंधारण कार्यक्रमाला गती देण्यासाठी अभियान काळात केलेल्या चांगल्या कार्याचा गौरव व्हावा या उद्देशाने जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायती व सेवाभावी संस्था यांना पुरस्कार देण्यासाठी संदर्भाधीन दिनांक १८ जून, २००३ च्या शासन निर्णयान्वये बक्षीस योजना जाहीर करण्यात आली आहे. तथापि या योजनेस मिळालेला सौम्य प्रतिसादाने त्याचे संदर्भाधीन दिनांक१६ डिसेंबर, २०१३ च्या शासन निर्णयान्वये स्वरुप बदलून व्यापक / सुधारित करण्यात आले आहे. तथापि, आता पुरस्कार योजनेत बदल करण्यात येत असल्याने दिनांक १६ डिसेंबर, २०१३ च्या शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे. शासनाने दिनांक ०५ डिसेंबर २०१४ अन्वये जलयुक्त शिवार अभियान सुरु केले आहे. या जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ठ योगदान देण्याऱ्या जिल्हा- तालुका आणि गावांना पुरस्कार प्रदान करण्यास मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्यातील पाण्याची उपलब्धता व वारंवार येणारी दुष्काळ सदृश परिस्थिती विचारात घेता जलसंवर्धनाच्या कार्यक्रमास अनन्यसाधारण महत्व प्राप्त झालेले आहे. महाराष्ट्रातील जवळ जवळ ८० टक्के क्षेत्र कोरडवाहू असून पर्जन्यधारीत आहे. राज्यातील सिंचन क्षमतेस मर्यादा आल्याने विविध स्त्रोताद्वारे पाण्याचा पुरेपूर उपयोग केल्यास कमाल २८ टक्के क्षेत्र ओलीताखाली येऊ शकते. कोरडवाहू क्षेत्रावर अवलंबून असलेल्या जनतेस अनिश्चित व अपु-या पर्जन्यवृष्टीमूळे आर्थिक संकटास आणि पाणि टंचाईस सामोरे जावे लागत आहे. या साठी राज्यातील कोरडवाहू क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मृद व जलसंधारण कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाद्वारे जमिनीची धूप थांबवणे, पाणलोटाच्या माथा ते पायथ्यामध्ये विविध उपचाराद्वारे अपधावेचे नियंत्रण करुन भूगर्भातील पाणी साठवणे, जमिनीचा पोत कायम राखून उत्पादनात वाढ करणे इत्यादी उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. राज्यातील टंचाईवर कायमस्वरुपी उपाय योजना करण्यासाठी शासनाने दिनांक ०५ डिसेंबर २०१४ रोजीच्या शासन निर्णयान्वये

जलयुक्त शिवार अभियान सुरु केले आहे. या अभियानात उत्कृष्ठ योगदान देण्या-या जिल्हा / तालुका / गावांना पुरस्कार देण्यास या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे. या पुरस्काराचा कालावधी या आर्थिक वर्षापासून पुढील ०५ वर्षापर्यंत अर्थात सन २०१९-२० या कालावधी पर्यंत राहील.

राज्यात जलयुक्त शिवार अभियानांतर्गत उत्कृष्ट काम करणा-यांना राज्य, विभाग व जिल्हा स्तरावर खालील नावाने पुरस्कार प्रदान करण्यात यावेत.

| स्तर | पुरस्कारांची नावे |
|---|---|
| **राज्यस्तर** | **महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्कार** |
| **विभागस्तर** | **राजमाता जिजाऊ जलमित्र पुरस्कार** |
| **जिल्हास्तर** | **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जलमित्र पुरस्कार** |

**<u>२. पुरस्काराचे स्वरूप</u>**:

जलयुक्त शिवार अभियानाचे महत्व जनतेपर्यंत पोहचवणे, जनतेचा, लोकसहभाग वाढविणे, पाण्याचा ताळेबंद व कार्यक्षम वापर करण्यास ग्रामस्थाना प्रोत्साहीत करणे आणि शासनाच्या विविध योजना प्रभावीपणे राबविणे याकरीता महत्वपूर्ण योगदान देणारे जिल्हे / तालुके / गाव या पुरस्कारसाठी पात्र राहतील.

उत्कृष्ट जिल्हा / तालुका / गाव यांना देण्यात येणा-या पुरस्कार निवडीचे स्वरुप, निकष व गुण सोबतच्या परिशिष्ट अ (१), अ (२), अ (३) व ब मध्ये दिलेल्या आहेत. त्याचप्रमाणे पुरस्कारासंदर्भात मार्गदर्शक सूचना, पुरस्काराबाबत कालबध्द कार्यक्रम व समित्यांनी करावयाची कार्यवाही याबाबतच्या सर्वसाधारण सूचना प्रपत्र १ व २ मध्ये नमूद करण्यात आलेल्या आहेत.

समितीची रचना, पुरस्कारांसंबंधी शासनाचे निर्णय अंतिम राहतील. निवड समितीची रचना खालीलप्रमाणे राहील :-

**<u>३. निवड समिती :</u>**

**<u>जिल्हास्तर</u>**

| **अ.क्र.** | **नाव** | |
|---|---|---|
| १ | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २ | मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद | सह अध्यक्ष |
| ३ | अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हापरिषद | सदस्य |
| ४ | उप वनसंरक्षक | सदस्य |
| ५ | कार्यकारी अभियंता (ल.पा) जिल्हापरिषद | सदस्य |
| ६ | कार्यकारी अभियंता जलसंपदा | सदस्य |
| ७ | वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण | सदस्य |
| ८ | उप जिल्हाधिकारी रोहयो | सदस्य |
| ९ | जिल्ह अधिक्षक कृषि अधिकारी | सदस्य सचिव |

**विभागस्तर**

| **अ.क्र.** | **नाव** | |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त | अध्यक्ष |
| २ | उपायुक्त (रोहयो) | सदस्य |
| ३ | उपायुक्त (विकास ) | सदस्य |
| ४ | अधीक्षक अभियंता ( जलसंधारण) | सदस्य |
| ५ | उप संचालक, भूजल सर्वेक्षण | सदस्य |
| ६ | अधिक्षक अभियंता ( जलसंपदा) | सदस्य |
| ७ | तज्ञ व्यक्ती ( जलसंधारण) | सदस्य |
| ८ | अशासकीय संस्था प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | विभागीय सह संचालक ( कृषि) | सदस्य सचिव |

**राज्यस्तर**

| अ.क्र. | नाव | |
|---|---|---|
| १ | मा.मंत्री (जलसंधारण) | अध्यक्ष |
| २ | मा.राज्यमंत्री (जलसंधारण) | उपाध्यक्ष |
| ३ | प्रधान सचिव (कृषि) | सदस्य |
| ४ | सचिव (जलसंधारण) | सदस्य |
| ५ | सचिव (ग्राम विकास) | सदस्य |
| ६ | आयुक्त (कृषि) | सदस्य |
| ७ | उपसचिव (जलसंधारण) | सदस्य |
| ८ | मुख्य अभियंता, लघुसिंचन, जलसंधारण | सदस्य |
| ९ | मुख्य अभियंता, लघुसिंचन, जलसंधारण (VIIDP) | सदस्य |
| १० | संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन | सदस्य सचिव |

त्याचप्रमाणे राज्यस्तरावरील गाव, तालुका व जिल्हा प्रथम, द्वितीय व तृतीय पुरस्कार निवडीसाठी संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन प्रत्यक्ष छाननी करुन राज्यस्तरीय समितीस आपल्या शिफारशी करतील.

अ) **जिल्हा स्तरावर द्यावयाचे गाव व तालुक्यांना पुरस्कर (रक्कम + स्मृतीचिन्ह ) गाव व तालुके**

| पुरस्कार | पुरस्काराची संख्या | एकूण पुरस्कार | बक्षिसाची रक्कम | एकूण रक्कम (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|
| गावे | ५ गावे प्रती जिल्हा | १७० | प्रथम क्र. रु.१ लाख | रु. ९३.५० लाख |
| | | | द्वितीय क्र. रु. ७५०००/- | |
| | | | तृतीय क्र.रु.५००००/- | |
| | | | चौथा रु. ३००००/- (उत्तेजनार्थ) | |
| | | | पाचवा रु.२००००/- (उत्तेजनार्थ) | |
| तालुके | २ तालुके प्रती जिल्हा | ६८ | प्रथम क्र.रु. ५ लाख | रु. २७२ लाख |
| | | | द्वितीय क्र. रु. ३ लाख | |

**ब) विभाग स्तरावर द्यावयाचे पुरस्कार (रक्कम + स्मृतीचिन्ह) - गाव, तालुके व जिल्हे**

| पुरस्कार | पुरस्काराची संख्या | एकूण पुरस्कार | बक्षिसाची रक्कम | एकूण रक्कम (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|
| गावे | २ गावे प्रती विभाग | १२ | प्रथम क्र. रु.७.५ लाख | रु. ७५ लाख |
| | | | द्वितीय क्र. रु. ५ लाख | |
| तालुके | २ तालुके प्रती विभाग | १२ | प्रथम क्र. रु. १० लाख | रु. १०५ लाख |
| | | | द्वितीय क्र. रु. ७.५ लाख | |
| जिल्हे | २ जिल्हे प्रती विभाग | १२ | प्रथम क्र. रु. १५ लाख | रु. १५० लाख |
| | | | द्वितीय क्र. रु.१० लाख | |

ख) राज्यस्तरावरुन प्रत्येकी ०३ जिल्हा/तालुका/गाव यांची प्रथम / द्वितीय /तृतीय पुरस्कारासाठी निवड करण्यात येईल. (रक्कम + स्मृतीचिन्ह)

| **राज्यस्तर** | **निवडण्यात आलेला जिल्हा/तालुके/गाव आणि रक्कम** | | | **बक्षिसाची एकूण रक्कम** |
|---|---|---|---|---|
| | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक | |
| गाव (३) | रु. २५ लाख | रु. १५ लाख | रु. ७.५ लाख | रु. ४७.५० लाख |
| तालुका (३) | रु. ३५ लाख | रु. २० लाख | रु. १० लाख | रु. ६५ लाख |
| जिल्हा (३) | रु. ५० लाख | रु. ३० लाख | रु. १५ लाख | रु. ९५ लाख |
| एकूण | | | | रु. २०७.५० लाख |

(ड) **राज्यस्तर-** वैयक्तिक पुरस्कार (व्यक्ती/शेतकरी) व सामुदायिक स्वरुपाचा पुरस्कार (अशासकीय संस्था)- (रक्कम +स्मृतीचिन्ह) सदर पुरस्कारासाठी निवडीचे निकष सोबतच्या परिशिष्ट “ब” मध्ये जोडले आहेत.

| **राज्यस्तर** | **रक्कम** | | **बक्षिसाची एकूण रक्कम** |
|---|---|---|---|
| | **प्रथम क्रमांक** | **द्वितीय क्रमांक** | |
| वैयक्तिक (१) | रु. ५००००/- | रु. ३००००/- | रु. ८००००/- |
| सामुदायिक (१) | रु. १५००००/- | रु. १०००००/- | रु. २५००००/- |

**(इ) <u>अधिकारी / कर्मचारी पुरस्कार :-</u>**

जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्याना /कर्मचा-यांना विहित निकषाच्या आधारे शासन स्तरावर निवड केलेल्या अधिकाऱ्यांना / कर्मचा-यांना वैयक्तिक पुरस्कार देण्यात यावेत. सदर निकष व निवड करण्याची कार्यपध्दत परिशिष्ट “क” मध्ये नमूद करण्यात आलेली आहे. राज्यस्तरावर प्रती जिल्हा १ अधिकारी अथवा कर्मचारी पुरस्कर्त्याची निवड करण्यात येईल. **एकूण ३४ पुरस्कार राज्यस्तरावरुन देण्यात येतील. त्याचप्रमाणे मंत्रालय खुद्द येथील जलसंधारण विभागातील दोन अधिकारी व दोन कर्मचारी यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल.**

तसेच विभाग स्तरावर जलयुक्त शिवार अभियानात प्रथम आलेल्या जिल्हयाच्या जिल्हाधिकारी व राज्यस्तरावर प्रथम, द्वितीय व तृतीय आलेल्या जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

४. सर्व गावांचे व तालुक्यांचे प्रस्ताव जिल्हास्तर समितीकडे दिनांक ३० ऑक्टोंबर पर्यंत पाठविण्यात यावे. सदर जिल्हास्तरावरील पुरस्कार दि. ३० नोव्हेंबर रोजीपर्यंत विभागीय स्तरावरील ३१ डिसेंबर रोजी पर्यंत व राज्यस्तरावरील पुरस्कार दि. ३१ जानेवारी रोजीपर्यंत निवडण्यात यावेत. याबाबतचा सविस्तर कार्यक्रम प्रपत्र- १ व प्रपत्र-२ मध्ये देण्यात आलेला आहे. पुरस्कारासाठी निवडलेल्या गाव, तालुका व जिल्हा यांना केवळ सर्वोच्च पुरस्काराची रक्कम अदा केली जाईल. विभागस्तर पुरस्कार कार्यक्रम दिनांक २० फेब्रुवारी रोजी व राज्यस्तर पुरस्कार कार्यक्रम दिनांक २७ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात यावेत.

५. प्रवेशिका निवडीसंबंधी किंवा त्या अनुषंगाने निर्माण होणाऱ्या अडचणी/समस्या इत्यादींसंबंधी निवडसमितीचा निर्णय अंतिम राहील. या बक्षीस योजने अंतर्गत वरील पुरस्कारासाठी करण्यात येणारा खर्च खालील लेखाशिर्षांतर्गत मंजूर केलेल्या निधीतून खर्च करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

"मागणी क्र.एल- ३,
२४०२-मृद संधारण (००)
१०२ मृद संधारण- (०४) मृद व जलसंधारण
(००) (००१) महात्मा ज्योतिबा फुले जल मित्र पुरस्कार (२४०२ १०३७ ) ०५, बक्षिसे

६. पुरस्कार प्राप्त झालेल्या गावे, तालुके व जिल्हे यांनी मिळणाऱ्या पुरस्काराच्या रकमेतून जलसंधारणाची /गाव विकासाची कामे करावीत.

७. सदर शासन निर्णय, नियोजन विभाग व वित्त विभाग यांच्या सहमतीने अनुक्रमे अनौपचारिक संदर्भ क्रमांक: २०६/का.१४३४, दिनांक ५/९/१५ व क्र.६२३/व्यय-१५, दिनांक २०/१०/१५ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०९२८१५३९५७४१२६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Shankar Trambak Jadhav

Digitally signed by Shankar Trambak Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=c83ebbb277c2e72c85231b87f684c424a13c398a4f921b6d167a8c859e9817f5, cn=Shankar Trambak Jadhav
Date: 2016.09.30 16:46:35 +05'30'

**(शं.त्र्यं.जाधव)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव,
२) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
३) मा. विधानपरिषद / विधानसभा विरोधी पक्ष नेता यांचे खाजगी सचिव
४) सर्व मा. राज्यसभा / लोकसभा / विधानपरिषद / विधानसभा सदस्य

५) मा. मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
६) मा. राज्यमंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव
७) कार्याध्यक्ष, आदर्शगांव संकल्प व प्रकल्प समिती, पुणे.
८) मुख्य सचिव यांचे सचिव,
९) सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,
१०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क (प्रसिध्दीकरीता),
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे,
१३) प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक महाराष्ट्र राज्य, पुणे.
१४) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,
१५) महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण संस्था, पुणे,
१६) अपर मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा राज्यस्तरीय पणलोत विकास यंत्रणा पुणे
१७) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य,पुणे
१८) मुख्य अभियंता,लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे
१९) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,
२०) संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर,
२१) कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर.
२२) कुलगुरु, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी/कुलगुरु पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
२३) कुलगुरु, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली.
२४) सर्व जिल्हाधिकारी,
२५) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,/सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
२६) सर्व सहसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे
२७) सर्व सहसंचालक, (सामाजिक वनीकरण ),
२८) सर्व विभागीय कृषि सहसंचालक,
२९) सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,/सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे,(स्थानिक स्तर)
३०) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,/महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दी करीता),
३१) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,
३२) सर्व सहसंचालक,सामाजिक वनीकरण वृत्ते,
३३) सर्व मुख्य वनसंरक्षक, / सर्व उपवनसंरक्षक,
३४) सर्व उपसंचालक,सामाजिक वनीकरण.
३५) सर्व उपायुक्त (विकास),
३६) सर्व उपायुक्त (रोहयो),
३७) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३८) महालेखापाल -१/२, महाराष्ट्र राज्य ,मुंबई / नागपूर . (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)
३९) अप्पर संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास कक्ष,
४०) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४१) निवासी लेखापरीक्षा, अधिकारी, मुंबई.
४२) जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व.
४३) नियोजन विभाग / वित्त विभाग, मंत्रालय , मुंबई
४४) सर्व उपसचिव / अवर सचिव/कक्ष अधिकारी,ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
४५) जल-८ (निवडनस्ती) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय,मुंबई .

**शासन निर्णय क्रमांक मफुअ-२०१५/प्र.क्र.३७/जल-८ दि. २८/०९/२०१६**

**परिशिष्ट- अ (१)**

सर्वांसाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत जलयुक्त शिवार अभियानामध्ये

उत्कृष्ट कार्य करणाऱ्या **गावांना** पारितोषिक योजना.

| अ.क्र. | बाब | एकूण गुण | अ.क्र. | निकष | कमाल गुण | प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १ | नियोजन | ३० | १ | शिवार भेट -कार्यान्वयीन यंत्रणा अधिकाऱ्यांनी ग्रामस्थांसमवेत शिवारभेट करणे. (ग्रामस्थ व यंत्रणांचा सहभाग विचारात घेवून गुणांकन करणे). | २ | |
| | | | अ | ग्रामस्थांचा व यंत्रणांचा ८० ते १०० % सहभाग -२ गुण | | |
| | | | ब | ग्रामस्थांचा व यंत्रणांचा ६० ते ८० टक्केपेक्षा कमी सहभाग-१ गुण | | |
| | | | २ | अभियान अंमलबजावणीकरीता शास्त्रोक्त व तंत्रशुध्द पध्दतीने दि.५.१२.२०१४ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट “क” प्रमाणे आराखडा तयार करणे- मंजूर असलेली कामे, नव्याने घ्यावायाची कामे, दुरूस्तीची कामे, परिपूर्ण आराखडा ८ गुण, अपूर्ण आराखडा- ४ गुण . | ८ | |
| | | | ३ | पाण्याचा ताळेबंद शास्त्रोक्त पध्दतीने करणे व गावाचा पाणी ताळेबंद व नेट प्लॅन आराखडा तयार करणे - ६ गुण, केला नसल्यास ० गुण. | ६ | |
| | | | ४ | आराखडयास ग्रामसभेची मंजूरी घेणे. | ४ | |
| | | | अ | ग्रामसभा घेतल्यास- ४ गुण | | |
| | | | ब | सभेमध्ये माहिती दिली असल्यास - २ गुण | | |
| | | | ५ | गावपातळीवर जलसाक्षरता व लोकसहभागाकरीता प्रभात फेरी, स्पर्धा, पथनाटय, एकांकिका, किर्तन व अन्य उपक्रम इ.चा जनजागृतीकरीता प्रभावी वापर.(एक उपक्रमास १ गुण याप्रमाणे ४ उपक्रमांस -४ गुण) | ४ | |
| | | | ६ | ग्रामपंचायत,युवकमंडळ, भजनीमंडळ,बचतगट/महिला मंडळ यांचा सहभाग (प्रत्येकी ०.५ गुण) | २ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ७ | आराखडा अंमलबजावणीकरीता ग्रामपंचायतीचे स्वउत्पन्न, लोकसहभाग व विविध कंपन्या, संस्था इ.निधीच्या माध्यमातून निधी अभिसरण (Convergence) बाबत नियोजन, नियोजन केले नसल्यास - ० गुण. | ४ | |
| २ | क्षेत्रिय कामे व अंमलबजावणी | ७५ | १ | माथा ते पायथा कामे (Area Treatment )<br>१)सलग समतल चर २) खोल सलग समतल चर ३) डोंगर उतारावर समपातळी दगडी बांध ४) ट्रेंच कम मांऊट ५) मजगी ६) कंपार्टमेंट बंडीग ७) ग्रेडेड बंडीग इत्यादी | | |
| | | | अ | प्रगती पथावरील कामे प्राप्त निधीनुसार पूर्ण करणे (आराखडयानुसार प्रगतीपथावरील कामांपैकी पूर्ण कामे ) | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | ब | प्राप्त निधीनुसार अस्तित्वातील कामांची दुरुस्ती करणे(आराखडयानुसार नादुरुस्त कामांपैकी पूर्ण कामे) | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | क | प्राप्त निधीनुसार नव्याने हाती घ्यावयाची कामे (आराखडयात प्रस्तावित नवीन कामांपैकी अभियान काळात प्रत्यक्ष पूर्ण केलेल्या कामांची संख्या विचारात घेवून गुण द्यावेत) | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | २ | जलसंधारण / जलसंचय उपचार ( Drainage Line Treatment/ Water Conservation)<br>१) शेततळी २) माती नाला बांध ३) सिमेंट नाला बांध ४) वळण बंधारा ५) नाला खोलीकरण व रुंदीकरण ६) लुजबोल्डर ७) अर्दन स्ट्रक्चर ८) गॅबियन स्ट्रक्चर इत्यादी. | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | अ | प्रगती पथावरील कामे पूर्ण करणे. (आराखडयानुसार प्रगतीपथावरील कामांपैकी पूर्ण कामे) | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | ब | अस्तित्वातील कामांची दुरुस्ती करणे (आराखडयानुसार नादुरुस्त कामांपैकी पूर्ण कामे) | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | क | नव्याने हाती घ्यावयाची कामे (आराखडयात प्रस्तावित नवीन कामांपैकी अभियान काळात पूर्ण कामे व प्रत्यक्ष पूर्ण केलेल्या कामांची संख्या विचारात घेऊन गुण दयावेत.) | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | ४ | स्त्रोत बळकटीकरण उपाययोजना (विहिर/ बोअरवेलपुनर्भरण,रिचार्ज शाफ्ट, ट्रेच शाफ्ट इ.) २ उपाययोजना- १ गुण याप्रमाणे, १० उपाययोजना - ५ गुण. | ५ | |
| | | | ५ | तुषार/ ठिबक सिंचनाखाली प्रस्तावीत क्षेत्र व प्रत्यक्ष सुक्ष्म सिंचनाखाली आणण्यात आलेले क्षेत्र हेक्टर १० हेक्टर - १ गुण याप्रमाणे, ५० हेक्टर- ५ गुण | ५ | |
| | | | ६ | भूजल अधिनियम अंमलबजावणी करणे, (बोरवेल बंदी करणे), केली नसल्यास- ० गुण. | ५ | |
| ३ | लोक सहभागातून कामे | ४५ | १ | गाळ काढणे- १ हजार घ.मी.ला १ गुण याप्रमाणे १५ हजार घ.मी.ला कमाल - १५ गुण | १५ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | २ | वनराई बंधारे / कच्चे बंधारे- २ बंधाऱ्यांला १ गुण याप्रमाणे २० बंधाऱ्यांला कमाल - १० गुण | १० | |
| | | | ३ | इतर विभागाशी अभिसरण करुन केलेली कामे- (रु. १ लक्षला १ गुण या प्रमाणे १० लक्षला १० गुण) | १० | |
| | | | ४ | नाविन्य पुर्ण उपक्रम- उदा.नदी /नाला जोड प्रकल्प, नाला खोली करण, रुंदी करण व अन्य उपक्रम ( एका उपक्रमांस ५ गुण याप्रमाणे ), केलेले नसल्यास- ० गुण. | १० | |
| ४ | फलनिष्पती | ३० | १ | आराखड्याची अंमलबजावणी | | |
| | | | अ | प्रस्तावित कामांपैकी प्रत्यक्ष पूर्ण कामे (संख्या) (प्राप्त निधीच्या प्रमाणात) ४० ते १००% यास अनुक्रमे प्रमाणे १ ते ७ गुण. | ७ | |
| | | | ब | आराखडयाची प्रस्तावित आर्थिक नियोजनाच्या तुलनेत प्रत्यक्ष साध्य-७० ते १००% यास अनुक्रमे प्रमाणे १ ते ४ गुण. | ४ | |
| | | | २ | प्राप्त निधीच्या प्रमाणात केलेल्या उपचारामुळे प्रस्तावित पाणीसाठा क्षमता व प्रत्यक्ष निर्माण पाणीसाठा क्षमता : १० ते १००% याप्रमाणे १ ते १० गुण | १० | |
| | | | ३ | भूजल पातळीत झालेल्या वाढ (अभियानापूर्वी व अभियानानंतरची परिस्थिती) : २ फुटाने- २ गुण<br>४ फुटाने- ४ गुण | ४ | |
| | | | ४ | वृक्षलागवड- १०० पेक्षा जास्त- ५ गुण<br>७५ ते १०० वृक्ष- ३ गुण,५० ते ७४ वृक्ष- २ गुण,<br>५०पेक्षा कमी- १ गुण | ५ | |
| ५ | पारदर्शकता व सामाजिक आंकेक्षण | २० | १ | पूर्ण झालेल्या कामांचे अक्षांक्ष रेखांक्ष छायाचित्र वेबसाईटवर अपलोड करणे ( http: // mrsac. maharashtra.gov.in /jalyukta)<br>८१-१००%- ५ गुण<br>६१-८०%- ३ गुण<br><६०%-२ गुण | ५ | |
| | | | २ | मंजूर व झालेल्या कामांची अद्ययावत माहिती सिमनिक वेबसाईटवर अपलोड करणे<br>८१-१००%- ५ गुण<br>६१-८०%- ३ गुण<br><६०%-२ गुण | ५ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ३ | मंजूर कामे सुरु करताना व कामावर झालेल्या खर्चाची माहिती ग्रामसभेसमोर ठेवली असल्यास - ०३ गुण, ठेवलेले नसल्यास - ० गुण | ३ | |
| | | | ४ | कामाच्या गुणवत्तेबाबत प्राप्त तक्रारींचे निराकरण करणे तसेच तक्रार प्राप्त नसल्यास | २ | |
| | | | | कामाच्या गुणवत्तेबाबत प्राप्त तक्रारींचे निराकरण केलेले नसल्यास :- ० गुण | | |
| | | | ५ | अभियान काळात झालेल्या कामांचे समवर्ती व त्र्यियस्थ यंत्रणामार्फत मूल्यमापन केले असल्यास- ०५ गुण, केले नसल्यास -० गुण | ५ | |
| | एकूण | २०० | | | २०० | |

## शासन निर्णय क्रमांक मफुअ-२०१५/प्र.क्र.३७/जल-८ दि. २८.९.२०१६

## परिशिष्ट- अ (२)

सर्वांसाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत जलयुक्त शिवार अभियानामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या **<u>तालुक्यांना</u>** पारितोषिक योजना.

| अ.क्र. | बाब | एकूण गुण | अ.क्र. | निकष | कमाल गुण | प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १ | नियोजन | १० | १ | अभियान अंमलबजावणीकरीता शास्त्रोक्त व तंत्रशुध्द पध्दतीने दि.५.१२.२०१४ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट “क” प्रमाणे आराखडा तयार करणे- मंजूर असलेली कामे, नव्याने घ्यावायाची कामे, दुरूस्तीची कामे, परिपूर्ण आराखडा १० गुण, अपूर्ण आराखडा- ५ गुण . | १० | |
| २ | क्षेत्रिय कामे व अंमलबजावणी | ७५ | १ | माथा ते पायथा कामे (Area Treatment )<br>१)सलग समतल चर २) खोल सलग समतल चर ३) डोंगर उतारावर समपातळी दगडी बांध ४) ट्रेंच कम मांऊट ५) मजगी ६) कंपार्टमेंट बंडीग<br>७) ग्रेडेड बंडीग इत्यादी | | |
| | | | अ | प्रगती पथावरील कामे प्राप्त निधीनुसार पूर्ण करणे (आराखडयानुसार प्रगतीपथावरील कामांपैकी पूर्ण कामे ) | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | ब | प्राप्त निधीनुसार अस्तित्वातील कामांची दुरुस्ती करणे(आराखडयानुर नादुरुस्त कामांपैकी पूर्ण कामे | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | क | प्राप्त निधीनुसार नव्याने हाती घ्यावयाची कामे (आराखडयात प्रस्तावित नवीन कामांपैकी अभियान काळात प्रत्यक्ष पूर्ण केलेल्या कामांची संख्या विचारात घेवून गुण द्यावेत) | १० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | २ | जलसंधारण / जलसंचय उपचार ( Drainage Line Treatment/ Water Conservation) १) शेततळी २) माती नाला बांध ३) सिमेंट नाला बांध ४) वळण बंधारा ५) नाला खोलीकरण व रुंदीकरण ६) लुजबोल्डर ७) अर्दन स्ट्रक्चर ८) गॅबियन स्ट्रक्चर इत्यादी. | | |
| | | | अ | प्रगती पथावरील कामे पूर्ण करणे. (आराखडयानुसार प्रगतीपथावरील कामांपैकी पूर्ण कामे ) | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | ब | अस्तित्वातील कामांची दुरुस्ती करणे (आराखडयानुसार नादुरुस्त कामांपैकी पूर्ण कामे) | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | क | नव्याने हाती घ्यावयाची कामे (आराखडयात प्रस्तावित नवीन कामांपैकी अभियान काळात पूर्ण कामे व प्रत्यक्ष पूर्ण केलेल्या कामांची संख्या विचारात घेऊन गुण दयावेत.) | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | ४ | स्त्रोत बळकटीकरण उपाययोजना (विहिर/ बोअरवेलपुनर्भरण,रिचार्ज शाफ्ट, ट्रेच शाफ्ट इ.) तालुक्यांतील गावांची सरासरी: २ उपाययोजना- १ गुण याप्रमाणे, सरासरी १० उपाययोजना -५ गुण. | ५ | |
| | | | ५ | तुषार/ ठिबक सिंचनाखाली प्रस्तावीत क्षेत्र व प्रत्यक्ष सुक्ष्म सिंचनाखाली आणण्यात आलेले क्षेत्र- तालुक्यांतील गावांची सरासरी: १० हेक्टरला - १ गुण याप्रमाणे, सरासरी ५० हेक्टरला - ५ गुण | ५ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ६ | भूजल अधिनियम अंमलबजावणी करणे, (बोरवेल बंदी करणे), केली नसल्यास- ० गुण. | ५ | |
| ३ | लोक सहभागातून कामे | ४५ | १ | गाळ काढणे- तालुक्यांतील गावांची सरासरी:- १ हजार घ.मी.ला १ गुण याप्रमाणे सरासरी १५ हजार घ.मी.ला कमाल - १५ गुण | १५ | |
| | | | २ | वनराई बंधारे / कच्चे बंधारे- तालुक्यांतील गावांची सरासरी:- २ बंधाऱ्यांला १ गुण याप्रमाणे सरासरी २० बंधाऱ्यांला कमाल - १० गुण | १० | |
| | | | ३ | इतर विभागाशी अभिसरण करुन केलेली कामे- १० गुण (तालुक्यांतील गावांची सरासरी: रु. १ लक्षला १ गुण या प्रमाणे १० लक्षला १०गुण) | १० | |
| | | | ४ | नाविन्य पुर्ण उपक्रम- नदी /नाला जोड प्रकल्प, नाला खोली करण, रुदी करण व अन्य उपक्रम (तालुक्यांतील गावांची सरासरी:-एका उपक्रमांस ५ गुण याप्रमाणे ), केलेले नसल्यास- ० गुण. | १० | |
| ४ | फलनिष्पती | ५० | १ | आराखड्याची अंमलबजावणी. | | |
| | | | अ | आराखडयाची प्रस्तावित आर्थिक नियोजनाच्या तुलनेत प्रत्यक्ष साध्य- १० ते १००% याप्रमाणे १.५ ते १५ गुण. | १५ | |
| | | | २ | प्राप्त निधीच्या प्रमाणत केलेल्या उपचारामुळे प्रस्तावित पाणीसाठा क्षमता व प्रत्यक्ष निर्माण पाणीसाठा क्षमता : १०ते १००% याप्रमाणे २ ते २० गुण. | २० | |
| | | | ३ | भूजल पातळीत झालेल्या वाढ (अभियानापूर्वी व अभियानानंतरची परिस्थिती) : ४ फुटाने- १० गुण २ फुटाने- ५ गुण. | १० | |
| | | | ४ | तालुक्यांतील गावांची सरासरी वृक्षलागवड- १०० पेक्षा जास्त- ५ गुण.<br>७५ ते १०० वृक्ष- ३ गुण,५० ते ७४ वृक्ष- २ गुण, ५०पेक्षा कमी- १ गुण | ५ | |
| ५ | पारदर्शकता व सामाजिक आंकेक्षण | २० | १ | पूर्ण झालेल्या कामांचे अक्षांक्ष रेखांक्ष छायाचित्र वेबसाईटवर अपलोड करणे ( http: // mrsac. maharashtra.gov.in /jalyukta)<br>८१-१००%- ५ गुण<br>६१-८०%- ३ गुण<br><६०%-२ गुण | ५ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | २ | मंजूर व झालेल्या कामांची अद्ययावत माहिती सिमनिक वेबसाईटवर अपलोड करणे<br>८१-१००%- ५ गुण<br>६१-८०%- ३ गुण<br><६०%-२ गुण | ५ | |
| | | | ३ | मंजूर कामे सुरु करताना व कामावर झालेल्या खर्चाची माहिती ग्रामसभेसमोर ठेवणे | ३ | |
| | | | | मंजूर कामे सुरु करताना व कामावर झालेल्या खर्चाची माहिती ग्रामसभेसमोर ठेवलेले नसल्यास- ० गुण | | |
| | | | ४ | कामाच्या गुणवत्तेबाबत प्राप्त तक्रारींचे निराकरण करणे तसेच तक्रार प्राप्त नसल्यास | २ | |
| | | | | कामाच्या गुणवत्तेबाबत प्राप्त तक्रारींचे निराकरण केलेले नसल्यास :- ० गुण | | |
| | | | ५ | अभियान काळात झालेल्या कामांचे समवर्ती व त्र्ययस्थ यंत्रणामार्फत मूल्यमापन करणे. | ५ | |
| | | | | अभियान काळात झालेल्या कामांचे समवर्ती व त्र्ययस्थ यंत्रणामार्फत मूल्यमापन केले नसल्यास-० गुण. | | |
| | एकूण | २०० | | | २०० | |

## शासन निर्णय क्रमांक मफुअ-२०१५/प्र.क्र.३७/जल-८ दि. २८.९.२०१६

### परिशिष्ट- अ (३)

सर्वांसाठी पाणी - टंचाईमुक्त महाराष्ट्र २०१९ अंतर्गत जलयुक्त शिवार अभियानामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या **जिल्ह्यांना** पारितोषिक योजना.

| अ.क्र. | बाब | एकूण गुण | अ.क्र. | निकष | कमाल गुण | प्राप्त गुण |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १ | नियोजन | १० | १ | अभियान अंमलबजावणीकरीता शास्त्रोक्त व तंत्रशुध्द पध्दतीने दि.५.१२.२०१४ च्या शासन निर्णयातील परिशिष्ट “क” प्रमाणे आराखडा तयार करणे- मंजूर असलेली कामे, नव्याने घ्यावयाची कामे, दुरूस्तीची कामे, परिपूर्ण आराखडा १० गुण, अपूर्ण आराखडा- ५ गुण . | १० | |
| २ | क्षेत्रिय कामे व अंमलबजावणी | ८० | १ | माथा ते पायथा कामे (Area Treatment ) १)सलग समतल चर २) खोल सलग समतल चर ३) डोंगर उतारावर समपातळी दगडी बांध ४) ट्रेंच कम मांऊट ५) मजगी ६) कंपार्टमेंट बंडीग ७) ग्रेडेड बंडीग इत्यादी | | |
| | | | अ | प्रगती पथावरील कामे प्राप्त निधीनुसार पूर्ण करणे (आराखडयानुसार प्रगतीपथावरील कामांपैकी पूर्ण कामे ) | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | ब | प्राप्त निधीनुसार अस्तित्वातील कामांची दुरुस्ती करणे(आराखडयानुार नादुरुस्त कामांपैकी पूर्ण कामे | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | क | प्राप्त निधीनुसार नव्याने हाती घ्यावयाची कामे (आराखडयात प्रस्तावित नवीन कामांपैकी अभियान काळात प्रत्यक्ष पूर्ण केलेल्या कामांची संख्या विचारात घेवून गुण द्यावेत) | १० | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | २ | जलसंधारण / जलसंचय उपचार ( Drainage Line Treatment/ Water Conservation)<br>१) शेततळी २) माती नाला बांध ३) सिमेंट नाला बांध ४) वळण बंधारा ५) नाला खोलीकरण व रुंदीकरण ६) लुजबोल्डर ७) अर्दन स्ट्रक्चर ८) गॅबियन स्ट्रक्चर इत्यादी. | | |
| | | | अ | प्रगती पथावरील कामे पूर्ण करणे. (आराखडयानुसार प्रगतीपथावरील कामांपैकी पूर्ण कामे ) | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | ब | अस्तित्वातील कामांची दुरुस्ती करणे (आराखडयानुसार नादुरुस्त कामांपैकी पूर्ण कामे) | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | क | नव्याने हाती घ्यावयाची कामे (आराखडयात प्रस्तावित नवीन कामांपैकी अभियान काळात पूर्ण कामे व प्रत्यक्ष पूर्ण केलेल्या कामांची संख्या विचारात घेऊन गुण दयावेत.) | १० | |
| | | | | प्रस्तावित आराखडयानुसार १०% कामे पूर्ण असल्यास - १ गुण याप्रमाणे १००% कामे पूर्ण असल्यास - १० गुण | | |
| | | | ४ | स्त्रोत बळकटीकरण उपाययोजना (विहिर/ बोअरवेलपुनर्भरण,रिचार्ज शाफ्ट, ट्रेच शाफ्ट इ.) जिल्हयांतील गावांची सरासरी: २ उपाययोजना - १ गुण याप्रमाणे, सरासरी २० उपाययोजना -१० गुण. | १० | |
| | | | ५ | तुषार/ ठिबक सिंचनाखाली प्रस्तावीत क्षेत्र व प्रत्यक्ष सुक्ष्म सिंचनाखाली आणण्यात आलेले क्षेत्र- जिल्हयांतील गावांची सरासरी: १० हेक्टरला - १ गुण याप्रमाणे, सरासरी ५० हेक्टरला - ५ गुण | ५ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ६ | भूजल अधिनियम अंमलबजावणी करणे, (बोरवेल बंदी करणे), केली नसल्यास- ० गुण. | ५ | |
| ३ | लोक सहभागातून कामे | ४५ | १ | गाळ काढणे- जिल्हयांतील गावांची सरासरी:- १ हजार घ.मी.ला १ गुण याप्रमाणे सरासरी १५ हजार घ.मी.ला कमाल - १५ गुण | १५ | |
| | | | २ | वनराई बंधारे / कच्चे बंधारे- जिल्हयांतील गावांची सरासरी:- २ बंधाऱ्यांला १ गुण याप्रमाणे सरासरी २० बंधाऱ्यांला कमाल - १० गुण | १० | |
| | | | ३ | इतर विभागाशी अभिसरण करुन केलेली कामे- १० गुण (जिल्हयांतील गावांची सरासरी: रु. १ लक्षला १ गुण या प्रमाणे १० लक्षला १०गुण) | १० | |
| | | | ४ | नाविन्य पुर्ण उपक्रम- नदी /नाला जोड प्रकल्प, नाला खोली करण, रुदी करण (प्रत्येकी ५ गुण ), केलेले नसल्यास- ० गुण | १० | |
| ४ | फलनिष्पती | ५० | १ | आराखड्याची अंमलबजावणी | | |
| | | | अ | प्रस्तावित कामांपैकी प्रत्यक्ष पूर्ण कामे (संख्या) (प्राप्त निधीच्या प्रमाणत)- १० ते १००% याप्रमाणे १ ते १० गुण | १० | |
| | | | ब | आराखडयाची प्रस्तावित आर्थिक नियोजनाच्या तुलनेत प्रत्यक्ष साध्य- १० ते १००% याप्रमाणे १ ते १० गुण | १० | |
| | | | २ | प्राप्त निधीच्या प्रमाणत केलेल्या उपचारामुळे प्रस्तावित पाणीसाठा क्षमता व प्रत्यक्ष निर्णाम पाणीसाठा क्षमता : १०ते १००% याप्रमाणे २ ते २० गुण | २० | |
| | | | ३ | भूजल पातळीत झालेल्या वाढ (अभियानापूर्वी व अभियानानंतरची परिस्थिती) : २ फुटाने- ३ गुण<br>४ फुटाने- ५ गुण | ५ | |
| | | | ४ | जिल्हयांतील गावांची सरासरी वृक्षलागवड- १०० पेक्षा जास्त- ४ गुण<br>७५ ते १०० वृक्ष- ३ गुण,५० ते ७४ वृक्ष- २ गुण, ५०पेक्षा कमी- १ गुण | ५ | |
| ५ | पारदर्शकता व सामाजिक आंकेक्षण | १५ | १ | पूर्ण झालेल्या कामांचे अक्षांक्ष रेखांक्ष छायाचित्र वेबसाईटवर अपलोड करणे ( http: // mrsac. maharashtra.gov.in /jalyukta)<br>८१-१००%- ४ गुण<br>६१-८०%- २ गुण<br><६०%-१ गुण | ४ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | २ | मंजूर व झालेल्या कामांची अद्ययावत माहिती सिमनिक वेबसाईटवर अपलोड करणे<br>८१-१००%- ४ गुण<br>६१-८०%- २ गुण<br><६०%-१ गुण | ४ | |
| | | | ३ | मंजूर कामे सुरु करताना व कामावर झालेल्या खर्चाची माहिती ग्रामसभेसमोर ठेवणे | २ | |
| | | | | मंजूर कामे सुरु करताना व कामावर झालेल्या खर्चाची माहिती ग्रामसभेसमोर ठेवलेले नसल्यास- ० गुण | | |
| | | | ४ | कामाच्या गुणवत्तेबाबत प्राप्त तक्रारींचे निराकरण करणे तसेच तक्रार प्राप्त नसल्यास | २ | |
| | | | | कामाच्या गुणवत्तेबाबत प्राप्त तक्रारींचे निराकरण केलेले नसल्यास :- ० गुण | | |
| | | | ५ | अभियान काळात झालेल्या कामांचे समवर्ती व त्र्ययस्थ यंत्रणामार्फत मूल्यमापन करणे. | ३ | |
| | | | | अभियान काळात झालेल्या कामांचे समवर्ती व त्र्ययस्थ यंत्रणामार्फत मूल्यमापन केले नसल्यास-० गुण | | |
| | एकूण | २०० | | | २०० | |

**शासन निर्णय क्र. मफुअ-२०१३/प्र.क्र.३७/जल-८, दिनांक : २८ /०९ /२०१६ चे**

**परिशिष्ट - "ब"**

**वैयक्तिक पुरस्कार (व्यक्ती / शेतकरी)**

| अ.क्र. | बाब | गुण |
|---|---|---|
| १ | जलयुक्त शिवार अभियानांतर्गत शिवार भेटीत सहभाग / ग्रामसभेत सहभाग. | ४ |
| २ | गाव / तालुका / जिल्हा पातळीवर जलसाक्षरता व लोकसहभागाकरिता / जनजागृतीकरिता प्रसार माध्यमांचा प्रभावी वापर. | ८ |
| ३ | आराखडा अंमलबजावणी करिता संस्था स्वउत्पन्न, लोकवर्गणी, विविध कंपन्या, संस्था इत्यादी माध्यमातून निधीचे नियोजन करण्यात सहभाग. | ८ |
| ४ | आराखडयानुसार कामे करुन घेण्यासाठी समन्वय व देखरेख. | ८ |
| ५ | पाणी वापराबाबतचे Water Budgeting महत्व जनतेला पटवून देणेत सहभाग. | ८ |
| ६ | पाण्याचा कार्यक्षमपणे वापर करणेबाबत जनतेस प्रोत्साहन देणेत सहभाग. | ८ |
| ७ | पिण्याच्या पाण्याचे स्रोत बळकटीकरण करणेबाबत प्रयत्न व लोकसहभाग घेणे. | ८ |
| ८ | गाळ काढणे व वनराई बंधारे बांधणेबाबत लोकसहभागाच्या माध्यमातून केलेले उल्लेखनीय कार्य. | १२ |
| ९ | नाला खोलीकरण, नालाजोड व नदीजोड प्रकल्पासारख्या नाविन्यपूर्ण कामांद्वारे पाणीसाठा वाढविण्याकरिता उपाययोजनात सहभाग / प्रोत्साहन. | १२ |
| १० | समन्वयाने व लोकसहभागातून केलेल्या कामांमुळे टंचाई परिस्थितीत झालेला बदल. | १२ |
| ११ | स्वसहभाग व प्रोत्साहनाद्वारे पीकरचना व पीकपध्दतीत घडवून आणलेला बदल. | ४ |
| १२ | वृक्ष लागवड व संवर्धनात प्रत्यक्ष व लोकांना प्रोत्साहीत करुन अंमलबजावणीत सहभाग. | ४ |
| १३ | मृद व जलसंधारणाच्या परिसंवादामध्ये सहभाग. | ४ |
| | **एकुण गुण :-** | १०० |

# सामूदायिक पुरस्कार (अशासकीय संस्था)

| अ.क्र. | बाब | गुण |
|---|---|---|
| १ | संस्था नोंदणीकृत असावी. | ४ |
| २ | मृद व जलसंधारण कामांचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा. | ५ |
| ३ | कायमस्वरुपी तांत्रिक मनुष्यबळ असावे. | ३ |
| ४ | संस्थेचे लेखापरिक्षण झालेले असावे. | ३ |
| ५ | संस्थेत महिलांचा सहभाग असावा. | ५ |
| ६ | लोकसहभागाद्वारे कामे केल्याची नोंद असावी. | ५ |
| ७ | गाव / तालुका / जिल्हा पातळीवर जलसाक्षरता व लोकसहभागाकरिता / जनजागृतीकरिता प्रसार माध्यमांचा प्रभावी वापर. | ५ |
| ८ | आराखडा अंमलबजावणी करिता संस्था स्वउत्पन्न, लोकवर्गणी, विविध कंपन्या, संस्था इत्यादी माध्यमातून निधीचे नियोजन करण्यात सहभाग. | ७ |
| ९ | आराखडयानुसार कामे करुन घेण्यासाठी समन्वय व देखरेख. | ५ |
| १० | पाणी वापराबाबतचे Water Budgeting महत्व जनतेला पटवून देणेत सहभाग. | ५ |
| ११ | पाण्याचा कार्यक्षमपणे वापर करणेबाबत जनतेस प्रोत्साहन देणेत सहभाग. | ६ |
| १२ | पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकटीकरण करणेबाबत प्रयत्न व लोकसहभाग घेणे. | ६ |
| १३ | गाळ काढणे व वनराई बंधारे बांधणेबाबत लोकसहभागाच्या माध्यमातून केलेले उल्लेखनीय कार्य. | ७ |
| १४ | नाला खोलीकरण, नालाजोड व नदीजोड प्रकल्पासारख्या नाविन्यपूर्ण कामांद्वारे पाणीसाठा वाढविण्याकरिता उपाययोजनात सहभाग / प्रोत्साहन. | ८ |
| १५ | समन्वयाने व लोकसहभागातून केलेल्या कामांमुळे टंचाई परिस्थितीत झालेला बदल. | ७ |
| १६ | स्वसहभाग व प्रोत्साहनाद्वारे पीकरचना व पीकपध्दतीत घडवून आणलेला बदल. | ७ |
| १७ | वृक्ष लागवड व संवर्धनात प्रत्यक्ष व लोकांना प्रोत्साहीत करुन अंमलबजावणीत सहभाग. | ७ |
| १८ | मृद व जलसंधारणच्या परिसंवादामध्ये सहभाग. | ५ |
| | **एकुण गुण :-** | १०० |

**शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक-मफुअ-२०१३/प्र.क्र.३७/जल-८, दिनांक २८/९/२०१६ चे सहपत्र**

**परिशिष्ट-"क"**

**विषय - जलयुक्त शिवार अभियानातील अधिकाऱ्याना / कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन/पुरस्कार देण्याची योजना-**

१) **पुरस्काराचे स्वरुप:**

पुरस्कार प्रशस्ती पत्र व सन्मान चिन्हाच्या स्वरुपात देण्यात येईल.

२) कोणत्या अधिकाऱ्यांना पुरस्कार दयावेत:

जलयुक्त शिवार अभियानात उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकाऱ्याना / कर्मचाऱ्यांना विहीत निकषाच्या आधारे शासन स्तरावर निवड केलेल्या अधिकाऱ्यांना / कर्मचाऱ्यांना वैयक्तिक पुरस्कार देण्यात यावेत.

३) अधिकाऱ्यांना पुरस्कार देण्यासाठी करावयाची विहीत कार्यपध्दती:

प्रत्येक जिल्हयाच्या जिल्हा कृषि अधिकारी यांनी कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांपैकी व्यक्तीगत पुरस्कारासाठी निकष पूर्ण करणाऱ्या २ अधिकाऱी व २ कर्मचारी अशी नावे सुचवावीत. अशी नावे सुचवितांना प्रत्येक जिल्हयाच्या कार्यकारी अभियंता लघुसिंचन जलसंधारण विभाग यांच्याशी विचारविनिमय करुन नावे सुचवावीत. मात्र एखादया संवर्गात पात्र व्यक्ती न आढळल्यास त्या संवर्गातील अधिकाऱ्यांचे नांव सुचविलेच पाहिजे असे नाही. परंतु याबाबतचा स्पष्ट उल्लेख इतर संवर्गातील अधिकाऱ्यांच्या नावाची शासनाकडे शिफारस करणाऱ्या पत्रात संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे. प्रत्येक जिल्हा कृषि अधिकारी यांनी प्रस्ताव विभागीय कृषि सहसंचालक यांच्याकडे छाननी करुन शिफारशीसह पाठवावेत व सर्व विभागीय कृषि सहसंचालक यांनी छाननी करुन शिफारशीसह प्रस्ताव संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांच्याकडे पाठवावेत. जिल्हास्तरावर प्रस्ताव ३० ऑक्टोबर, पर्यंत प्राप्त करुन घ्यावेत. जिल्हयांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन २ अधिकाऱी व २ कर्मचारी यांचे प्रस्ताव दिनांक ३० नोव्हेंबर, पर्यंत विभागस्तरावर विभागीय कृषि सहसंचालक यांनी प्रस्ताव पाठवावेत. सर्व विभागीय कृषि सहसंचालक यांनी प्रस्तावांची छाननी करुन प्रति जिल्हा १ अधिकारी व १ कर्मचारी यांचे प्रस्ताव दिनांक ३० डिसेंबर, पर्यंत संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांच्याकडे प्रस्ताव पाठवावेत. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांनी प्रस्तावांची छाननी करुन प्रस्ताव दिनांक ५ जानेवारी पर्यत शासनास सादर करावेत. राज्यस्तरावर दिनांक ३१ जानेवारी, पर्यंत अंतिम निकाल जाहिर करावेत.

**<u>पुरस्कारांची संख्या :</u>**

प्रत्येक जिल्हयातून २ अधिकारी व २ कर्मचारी असे एकूण ४ नामांकन विभागीय स्तरावर पाठविण्यात यावेत. विभागीय स्तरावरुन प्रती जिल्हा २ नामांकन राज्यस्तरावर पाठविण्यात यावेत. या प्रस्तावातून राज्यस्तरावर प्रती जिल्हा १ पुरस्कर्त्याची निवड करण्यात येईल. (एकूण ३४ पुरस्कार राज्यस्तरावरुन देण्यात येतील.)

तसेच विभाग स्तरावर जलयुक्त शिवार अभियानात प्रथम आलेल्या जिल्हयाच्या जिल्हाधिकारी व राज्यस्तरावर प्रथम द्वितीय व तृतीय आलेल्या जिल्हयाच्या जिल्हाधिकारी यांना प्रशस्ती पत्र व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

**४) पुरस्काराचे निकष:**

वैयक्तिक पुरस्कार देण्यासाठी निकष खालीलप्रमाणे राहतील:-

अ) खात्यामध्ये मागील ५ वर्षात केलेल्या एकूण कामाचा आढावा घेऊन पात्रता ठरविण्यात यावी.

ब) सदर अधिकाऱ्यांनी गेल्या ५ वर्षात केलेल्या कामगिरीच्या विवरणाची छाननी करुन त्या अधिकाऱ्यांच्या पात्रतेबद्दल विचार करण्यात यावा.

क) वैयक्तिक अधिकाऱ्यांना पुढील बाबी लक्षात घेऊन बक्षिसासाठी पात्र ठरविण्यात यावे: निर्विवाद सचोटी

१) निष्कलंक चारित्र्य
२) विभागीय चौकशी/न्यायालयीन प्रकरण नसावे.
३) तांत्रिक कार्यक्षमता
४) बुध्दिमत्ता व त्यांनी विकसित केलेले तंत्रज्ञान
५) दिलेल्या कामाची वेळेमध्ये/वेळेपूर्वी केलेली उद्दीष्टपूर्ती
६) मंजूर निधीचा योग्य व नियोजनपूर्ण वापर
७) खात्याबाहेरील व्यक्तींनी/जागतिक शिष्टमंडळ इत्यादी संस्थांनी कामाबद्दल केलेली प्रशंसा
८) प्रसंगावधान राखून संकटकाळात केलेल्या उपाययोजनेमुळे टाळलेली संभाव्य जीवित व वित्तहानी
९) जनता व कर्मचारी यांच्याशी असलेल्या संबंधामुळे जनमानसात उंचावलेली प्रतिमा
१०) वैशिष्टयपूर्ण केलेले काम व कामाचा दर्जा
११) कार्यालयीन कामकाजात असणारे विशेष लक्ष व कार्यालयील कामाकाजाच्या पध्दतीत सुचविलेल्या सुधारणेमुळे व खर्चात होणारी बचत
१२) शासकीय आदेशांचे पालन
१३) विशिष्ट कामात असलेले प्राविण्य व त्याची कामामध्ये केलेला उपयोग
१४) नवीन संकल्पना सुचविल्यामुळे कामाच्या खर्चामध्ये झालेली बचत
१५) संगणकीकरणाच्या कामामध्ये विशेष रस
१६) जनतेच्या व कर्मचाऱ्यांच्या तक्रारींच्या निवारणामध्ये दाखविलेली तत्परता
१७) इतर गुणवत्ता

**५) जलसंधारण विभागातील अधिकाऱ्यांची पुरस्कारसाठी अंतिम निवड करण्याची कार्यपध्दती:**

संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे / विभागीय आयुक्तांकडून शासन स्तरावर पुरस्कार प्रदान करण्यासाठी जलयुक्त शिवार अभियानात वैयक्तिक नावांच्या शिफारशी आल्यानंतर सदर नावांमधून पुरस्कार देण्यासाठी तसेच मंत्रालय खुद्द जलसंधारण विभाग येथील २ अधिकारी व २ कर्मचारी यांच्या नावाची अंतिम नावाची शासनास शिफारस करण्यासाठी शासन स्तरावरील समिती खालीलप्रमाणे राहील:-

| | | |
|---|---|---|
| (एक) | सचिव (जलसंधारण) | अध्यक्ष |
| (दोन) | सचिव (ग्रामविकास व पंचायत राज) | सह अध्यक्ष |
| (तीन) | उपसचिव (पंचायत राज) ग्रा.वि.व.ज.सं.वि. | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| (चार) | उपसचिव (योजना) जलसंधारण | सदस्य |
| (पाच) | अवर सचिव (जल-८) | सदस्य |
| (सहा) | अवर सचिव (जल-७) | सदस्य |
| (सात) | अधिक्षक अभियंता, लघुसिंचन जलसंधारण, पुणे | सदस्य |
| (आठ) | सहसंचालक, मृदसंधारण, पुणे | सदस्य सचिव |

अधिकाऱ्यांना पुरस्कार देण्याबाबत उपरोक्त समितीच्या शिफारशीवर अंतिम निर्णय शासन घेईल. अधिकाऱ्यांना पुरस्कार देण्याच्या निकषामध्ये आवश्यकतेनुसार वेळोवळी बदल करण्याचे अधिकार वरील समितीकडे राहतील.

६) वरीलप्रमाणे विभागीय आयुक्तांकडून शिफारशी प्राप्त करुन घेऊन शासन स्तरावरील समितीच्या शिफारशी तयार करण्याच्या बाबी कार्यासन जल-८ कडून हाताळल्या जातील.

७) अधिकाऱ्यांना पुरस्कार देण्याच्या योजनेचे दोन वर्षानंतर पुनर्विलोकन करण्यात येईल.

# प्रपत्र-१

## जलयुक्त शिवार अभियानातील गाव, तालुके, जिल्हे यांच्या मुल्यमापनासाठी सर्वसाधारण सूचना:-

१. जलयुक्त शिवार अभियानातील गावे, तालुके, जिल्हे यांचे मुल्यमापन सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील उद्दिष्ट व साध्याच्या आधारावर करावयाचे आहे. त्यानंतर क्रमाने त्यापुढील सन २०१६-१७, २०१७-१८, २०१८-१९ व २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी करणे अपेक्षित त्याप्रमाणे मुल्यमापन करण्यात यावे.
२. गाव, तालुका व जिल्हा यांच्या मूल्यमापनासाठी एकूण २०० गुण आहेत.
३. मूल्यमापन करताना बहुतांश मुद्यांमध्ये संबंधित योजनेतील कामाच्या प्रगतीच्या टक्केवारीच्या स्वरूपात गुण देणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने वस्तुनिष्ठ पध्दतीने गुण देय ठरतील.
४. काही मुद्यांसाठी विहित केलेल्या कमाल गुणांपैकी त्या योजनेतील साध्य (Achievement) च्या टक्केवारीच्या प्रमाणातच गुण अनुज्ञेय राहतील.
५. काही मुद्यांबाबत "होय" या स्वरुपात माहिती अपेक्षित आहे. अशा मुद्यांबाबत संबंधित गाव, तालुका व जिल्हा यांचे उत्तर "नाही" असल्यास या मुद्यांसाठी गुण देय राहणार नाही. याबाबत कोणतेही तारतम्य (Discretion) वापरावयाचे नाही.
६. ज्या गावांची/तालुक्याची/जिल्ह्यांची पारितोषीक निवड समिती व पडताळणी समिती यांनी केलेल्या तपासणीअंती त्यांना प्राप्त होणाऱ्या एकुण गुणांमध्ये किमान १०% किंवा त्या पेक्षा जास्त टक्केवारीने गुण कमी झाल्यास, गावे/तालुके/जिल्हे या योजनेच्या पुरस्कारासाठी पात्र ठरणार नाहीत.
७. तालुका व जिल्हयांने गुणदान करताना आवश्यक तेथे तालुका व जिल्हयांतील गावांची सरासरी काढुन आलेल्या टक्केवारीच्या प्रमाणानुसार गुणदान करावे. सरासरी काढण्यासाठी सर्व तालुका व जिल्हयांनी सर्व गावांचे परिशिष्ठ भरून घ्यावेत.
८. सर्व स्तरावर, गाव ,तालुका व जिल्हा यांची निवड करताना गाव ,तालुका व जिल्हा यांचे गुण समान असल्यास त्यांना त्या क्रमांकाचे पुरस्कार विभागुण देण्याचे प्रस्तावीत करावे.

## बक्षिस योजनेसाठी निवडीचे प्रस्ताव पाठविण्यासाठी कालमर्यादा:-

"जलयुक्त शिवार अभियान" मध्ये भाग घेणाऱ्या गाव, तालुके, जिल्हे यांनी प्रस्ताव तालुकास्तरावरून प्रस्ताव, जिल्हास्तर समितीकडे व जिल्हा स्तरावरून प्रस्ताव, विभागस्तर समितीकडे व त्यानंतर राज्यस्तरावर, खालील प्रमाणे विहित केलेल्या कालमर्यादेत पाठवणे आवश्यक आहे:-

| अ.क्र. | गाव व समित्यांनी करावयाची कार्यवाही | कालमर्यादा |
|---|---|---|
| १ | गाव तालुक्याकडुन केलेल्या कामांचे नामांकन पत्र/ पुरस्कार प्रस्ताव भरुन घेणे | ३० ऑक्टोंबर, अखेर पर्यंत |
| २ | जिल्हा स्तरावरुन गाव व तालुक्याची पाहाणी करणे | १ ते १० नोव्हेंबर |
| ३ | जिल्हा स्तरावरील गाव व तालुका निवड निकाल अंतिम करणे. जिल्ह्यांचे प्रस्ताव अंतिम करणे. | २५ नोव्हेंबर |

| | | |
|---|---|---|
| ४ | विभागीय स्तरीय पारितोषिकासाठी गाव/ तालुका/जिल्हा यांचे प्रस्ताव विभागस्तरीय समितीस पाठविणे | ३० नोंव्हेंबर अखेर पर्यंत |
| ५ | विभागस्तरीय समितीने गाव/ तालुका/ जिल्हयांची पहणी करणे | १ ते १० डिसेंबर |
| ६ | विभाग स्तरावरील गाव, तालुका व जिल्हा निवड निकाल अंमित करणे | २५ डिसेंबर |
| ७ | राज्यस्तरीय पारितोषिकासाठी गाव, तालुका व जिल्हा यांचे प्रस्ताव शासनाकडे पाठविणे | ३१ डिसेंबर अखेर पर्यंत |
| ८ | राज्यस्तरीय समितीने गाव/तालुका/जिल्हयांची पाहणी करणे | १ ते १५ जानेवारी |
| ९ | राज्यस्तरीय समितीने गाव/तालुका/जिल्हा यांचे निकाल अंतिम करणे | ३१ जानेवारी |
| १० | पारितोषिक वितरण | २०- २७ फेब्रुवारी |

गावे, तालुके व जिल्हा या सर्व स्तरांवरून मूल्यमापनाचे अहवाल विहित केलेल्या कालमर्यादेत विभागीय आयुक्तांमार्फत राज्य शासनास सादर होतील याबाबत विभागीय कृषि सहसंचालक (कृषि) यांची वैयक्तीक जबाबदारी राहील. विभागीय कृषि सहसंचालक (कृषि) यांनी याबाबत जिल्हाधिकारी यांच्याशी समन्वय ठेवून कार्यवाही करावयाची आहे.

## <u>वैशिष्ट्यपूर्ण कामाची टिप्पणी पाठविणे:-</u>

जिल्हयातील प्रथम क्रमांकासाठी प्राप्त ठरलेली गावे, तालुके यांच्या संदर्भात गावांची प्राथमिक माहिती व वैशिष्टयपूर्ण कामाची संक्षिप्त टिप्पणी तयार करून, जिल्हाधिकारी यांनी निवडक छायाचित्रासह विभागीय आयुक्तांकडे पाठवावी. विभागीय आयुक्तांनी विभागीय स्तरावरील बक्षिस पात्र गावे, तालुके व विभागातून प्रथम आलेली जिल्हे, तालुके व गावे यांची प्राथमिक माहिती व वैशिष्टयपूर्ण कामाची संक्षिप्त टिप्पणी राज्य शासनाकडे पाठवावी. या माहितीच्या आधारे बक्षिस वितरण समारंभाच्यावेळी संबंधित संस्थेच्या कामाबाबत छायाचित्राच्या सहाय्याने माहिती देणे सुलभ होईल.

## <u>जिल्हा व विभागस्तरीय पुरस्कार समारंभ :-</u>

जिल्ह्यातील पहिले ५ गावे व २ तालुके यांना बक्षीस रक्कमेचां धनादेश व सन्मानचिंन्ह देऊन विभागस्तरावर गौरव करावा. तसेच पुरस्कारासाठी निवडण्यात आलेल्या सर्व गावे व तालुके यांना सन्मानचिंन्ह व रक्कम धनादेशाव्दारे अदा करण्यात यावे व जिल्हास्तरीय गाव व तालुका यांना व विभागस्तारावर दयावयाचे पुरस्कार विभागस्तरावर एकत्रितरित्या समारंभ अयोजित करुन देण्यात यावे.

<u>विविध स्तरावर निवड करावयाचे गावे, तालुके व जिल्हे तपासणी बाबत:-</u>

१. **जिल्ह्यातून गावाला देण्यात येणारे पारितोषिक:-** जिल्हास्तरीय समितीने त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या जिल्हयातील गावांच्या प्रस्तावापैकी गुणानुक्रमे यादी तयार करावी. गुणानुक्रमे ७ गावांची तपासणी करून गुणानुक्रमे प्रथम ५ गावांची जिल्हास्तर पुरस्कारासाठी निवड करावी. या ५ गावांतून प्रत्येक जिल्हयातून प्रथम आलेल्या १ गावाची शिफारस विभागस्तरीय समितीकडे करावी.
२. **जिल्ह्यातून तालुक्याला देण्यात येणारे पारितोषिक:-** जिल्हास्तरीय समितीने त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या तालुक्यांच्या प्रस्तावापैकी गुणानुक्रमे यादी तयार करावी. सदर यादीतील गुणानुक्रमे ४ तालुक्यांच्या प्रस्तावाची छाननी करावी व २ तालुक्यांची जिल्हयातून प्रथम, व्दितीय जिल्हास्तरीय

पुरस्कारासाठी निवड करण्यात यावी व प्रत्येक जिल्हयातील एक तालूक्याची शिफारस विभागस्तरीय समितीकडे करावी.

३. **विभागातून गावाला देण्यात येणारे पारितोषिकः-** प्रत्येक जिल्ह्यातून (१) प्राप्त झालेल्या गावांपैकी विभागस्तरावर गुणानुक्रमे यादी तयार करावी. एकुण प्राप्त ६ किंवा ८ गावांमधून ४ गावांची छाननी/ तपासणी करून २ गावांची निवड विभागस्तरावर विभागीय प्रथम, व्दितीय पुरस्कारासाठी करावी व सदर दोन गावांचा प्रस्ताव राज्यस्तरीय समितीकडे सादर करावा.

४. **विभागातून तालुक्याला देण्यात येणारे पारितोषिक**:- प्रत्येक जिल्ह्यातून प्राप्त झालेल्या तालुक्यांपैकी विभागस्तरावर गुणानुक्रमे यादी तयार करावी. एकुण प्राप्त ६ किंवा ७ तालुक्यांमधून ४ तालुक्यांची छाननी/ तपासणी करून २ तालुक्यांची निवड विभागस्तरावर प्रथम, व्दितीय पुरस्कारासाठी करावी व सदर दोन तालुक्यांचा प्रस्ताव राज्यस्तरीय समितीकडे सादर करावा.

५. **विभागातून जिल्हयाला देण्यात येणारे पारितोषिकः-** सर्व प्राप्त झालेल्या जिल्हयांच्या प्रस्तावातून गुणानुक्रमे यादी बनवावी व तीन जिल्हयांच्या तपासणीअंती २ जिल्हयांची निवड विभागस्तरावर प्रथम, व्दितीय पुरस्कारासाठी करावी व सदर दोन जिल्हयांचा प्रस्ताव राज्यस्तरीय समितीकडे सादर करावा.

६. **राज्यस्तर गाव, तालुका, जिल्हा यांना देण्यात येणारे पारितोषिक**:- विभागातून गुणानुक्रमे प्राप्त झालेल्या एकुण १२ गावे, १२ तालुके व १२ जिल्हयांच्या प्रस्तावातून प्रथम, व्दितीय, तृतीय अशा तीन गावे, तीन तालुके व तीन जिल्हे यांची निवड राज्यस्तरीय समितीने करावी. सदर निवडीस मा.मंत्री, जलसंधारण यांची मान्यता घेण्यात यावी.

७. **वैयक्तिक (२)/ अशासकीय संस्था (२) पुरस्कार** :- याबाबतचे प्रस्ताव संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, पुणे यांना पाठविण्यात यावेत व त्यांनी छाननी करून प्रथम ४ गुणानुक्रमे प्रस्ताव निवडीसाठी राज्यस्तरीय समितीकडे पाठविणे. राज्यस्तर समितीने सदर प्रस्तावातून वैयक्तिक प्रथम व व्दितीय तसेच अशासकीय संस्थांमधून प्रथम व व्दितीय अशा पुरस्कारांची निवड करुन त्यास मा.मंत्री, जलसंधारण यांची मान्यता घेण्यात यावी.

************

**शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक-मफुअ-२०१३/प्र.क्र.३७/जल-८, दिनांक २८/९/२०१६ चे प्रपत्र-२**

**जिल्हा/ विभाग/राज्य स्तरावर करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचे स्वरुप**

| स्तर | गावे | तालुका | जिल्हा | शेरा |
|---|---|---|---|---|
| **जिल्हा स्तरीय समिती** | जिल्हा स्तरीय समितीने सर्व गावांच्या प्रस्तावांची छाननी करून जिल्ह्यातील गावांची गुणानुक्रमे यादी बनवावी.<br>जिल्हा स्तरीय समितीने त्यापैकी पहिल्या सात गावांची क्षेत्रिय तपासणी करावी व गुणानुक्रमे पहिल्या पाच गावांची पुरस्कारासाठी निवड करून पहिल्या एक गावांचा प्रस्ताव विभागस्तरीय समितीकडे विभागस्तर पुरस्कारासाठी पाठवावा.<br><br>कार्यवाहीची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर | जिल्हास्तरीय समितीने परिशिष्टामध्ये नमूद केल्यानुसार / सादर केलेल्या प्रस्तावाच्या निकषांनुसार छाननी करून तालुक्यांची गुणानुक्रमानुसार यादी बनवावी. या यादीच्या आधारे उच्चतम गुण प्राप्त करणाऱ्या चार तालुक्यांची तपासणी करून त्यामध्ये उच्चतम गुण धारण करणाऱ्या एकुण दोन तालुक्यांची पुरस्कारासाठी निवड करावी व एका/प्रथम आलेल्या तालुक्यांचा प्रस्ताव विभागीय समितीकडे विभागस्तर पुरस्कारासाठी पाठविण्यात यावा.<br><br>कार्यवाहीची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर | जिल्हयास्तर समितीने परिशिष्ठामध्ये नमूद केल्यानुसार त्यांनी केलेली कामगिरी/निकषांची पुर्तता नमूद करुन जिल्हयांचे प्रस्ताव विभागीय आयुक्त स्तरावर सादर करणे.<br><br>कार्यवाहीची अंतिम तारीख ३० नाव्हेंबर | या पुरस्कारासाठी क्षेत्रिय तपासणी करण्यासाठी जिल्हास्तरीय निवड समितीने व्दिसदस्यीय समितीची स्थापना करावी.<br>जिल्हा स्तरावरील एक व्दिसदस्यीय समिती ७ गावांची व ४ तालुक्यांची क्षेत्रिय तपासणी करेल. सदर व्दिसदस्यीय समितीने क्षेत्रिय तपासणी करून अहवाल मान्यतेस्तव निवड समितीपुढे ठेवावा व निवड समितीने मान्यता दिल्यावर गाव, तालुके, जिल्हा यांचे विभागस्तरीय पुरस्कारासाठीचे प्रस्ताव विभागस्तरीय समितीकडे पाठवावेत. |

## शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक८-जल/३७.क्र.प्र/२०१३-मफुअ-, दिनांक २८२०१६/९/ चे प्रपत्र-२

## जिल्हा/ विभाग/राज्य स्तरावर करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचे स्वरुप

| स्तर | गावे | तालुका | जिल्हा | शेरा |
|---|---|---|---|---|
| विभाग स्तरीय समिती | विभागस्तरीय समितीने सर्व जिल्हयांकडून आलेल्या गावांच्या प्रस्तावांची छाननी करुन विभागातील गाव यांची गुणानुक्रमे यादी बनवावी. विभागस्तरीय समितीने त्यापैकी गुणानुक्रमे पहिल्या चार गावांची क्षेत्रिय तपासणी करुन, त्या विभागामधील उच्चतम गुणवत्ताधारण दोन गावांची विभागस्तर पुरस्कारासाठी निवड करावी व त्यांचा प्रस्ताव राज्यस्तरीय पुरस्कारासाठी राज्यस्तरीय समितीकडे पाठवावा. त्या विभागातील पहिले दोन गावे जलयुक्त शिवार अभियानांतील विभागस्तरीय पुरस्कारासाठी पात्र ठरतील.<br><br>कार्यवाहीची अंतिम तारीख :- ३१ डिसेंबर | विभागस्तरीय समितीने सर्व जिल्हयांतून आलेल्या तालुके यांच्या प्रस्तावांची छाननी करुन जिल्ह्यातील तालुका यांची विभागस्तरावर गुणानुक्रमे यादी बनवावी. विभागस्तरीय समितीने त्यापैकी पहिल्या ४ तालुका यांची क्षेत्रिय तपासणी करून, त्या विभागमधील उच्चतम गुणवत्ताधारक २ तालुके यांची विभागस्तरीय पुरस्कारासाठी निवड करावी व राज्यस्तरीय पुरस्कारासाठी त्यांचा प्रस्ताव राज्यस्तरीय समितीकडे पाठवावा.<br><br>कार्यवाहीची अंतिम तारीख :- ३१ डिसेंबर | विभागस्तर समितीने सर्व जिल्हयांची परिशिष्टानुसार केलेल्या कामगिरी/ निकषांनुसार त्यांची छाननी करुन, जिल्हयांची गुणानूक्रमानुसार यादी बनवावी. या यादीच्या आधारे उच्चतम गुणप्राप्त करणाऱ्या तीन जिल्हयांची तपासणी करून त्यामध्ये उच्चतम गुण धारण करणाऱ्या एकुण दोन जिल्हयांचा प्रस्ताव राज्यस्तरीय समितीकडे पाठविण्यात यावा. तसेच विभागस्तरीय समितीने प्रथम येणाऱ्या दोन जिल्हयांची विभागस्तरीय पुरस्काराची निवड करावी.<br>कार्यवाहीची अंतिम तारीख :- ३१ डिसेंबर | या पुरस्कारासाठी क्षेत्रिय तपासणी करण्यासाठी विभागस्तरीय निवड समितीने व्दिसदस्यीय समितीची स्थापना करावी.<br>विभाग स्तरावरील एक व्दिसदस्यीय समिती ४ गावे, ४ तालुके व ३ जिल्हे यांची क्षेत्रिय तपासणी करेल.<br>सदर व्दिसदस्यीय समितीने क्षेत्रिय तपासणी करुन अहवाल मान्येस्तव विभागस्तर निवड समितीस सादर करावा.<br>विभागस्तर समितीने मान्यता दिल्यावर २ गावे, २ तालुके व २ जिल्हे यांचा प्रस्ताव राज्यस्तरीय समितीकडे पाठवावा |

**शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, क्रमांक८-जल/३७.क्र.प्र/२०१३-मफुअ-, दिनांक २८२०१६/९/ चे प्रपत्र-२**

**जिल्हा/ विभाग/राज्य स्तरावर करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचे स्वरुप**

| स्तर | गावे | तालुका | जिल्हा | शेरा |
|---|---|---|---|---|
| **राज्यस्तरीय समिती** | प्रत्येक विभागस्तरावरुन प्राप्त झालेल्या प्रथम / आलेल्या अशा एकुण १२ गावांच्या प्रस्तावांची छाननी /तपासणी करून त्यामधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त अशा तीन गावांची निवड राज्यस्तरीय जलयुक्त शिवार अभियान पुरस्कारासाठी करावी.<br><br>कार्यवाहीची अंतिम तारीख :- ३१ जानेवारी | प्रत्येक विभाग स्तरावरुन प्राप्त झालेल्या प्रथम / आलेल्या अशा एकुण १२ तालुक्यांच्या प्रस्तावांची छाननी / तपासणी करून तसेच क्षेत्रिय तपासणी करुन त्यामधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त अशा तीन तालुक्यांची निवड राज्यस्तरीय जलयुक्त शिवार अभियाना पुरस्कारासाठी करण्यात यावी<br><br>कार्यवाहीची अंतिम तारीख :- ३१ जानेवारी | प्रत्येक विभागस्तरावरुन प्राप्त झालेल्या एकूण १२ जिल्हयांच्या प्रस्तावांची छाननी /तपासणी करुन त्यामधील उच्चतम गुणवत्ताप्राप्त अशा तीन जिल्हयांची निवड राज्यस्तरीय जलयुक्त शिवार अभियान पुरस्कारासाठी करण्यात यावी.<br><br>कार्यवाहीची अंतिम तारीख :- ३१ जानेवारी | या पुरस्कारासाठी क्षेत्रिय तपासणी करण्यासाठी आवश्यकतेनुसार राज्यस्तरीय निवड समिती व्दिसदस्यीय समितीची स्थापना करेल अथवा शासन निर्णयात नमूद केल्यानुसार राज्यस्तरावर निवडावयाच्या गाव /तालुका/जिल्हा याबाबतच्या समितीने / व्दिसदस्यीय समिती गावे, तालुका, जिल्हा यांची क्षेत्रिय तपासणी करेल. सदर व्दिसदस्यीय समितीने क्षेत्रिय तपासणी करुन अहवाल मान्येस्तव निवड समितीपुढे ठेवावा. अशा प्राप्त झालेल्या क्षेत्रिय अहवालाची राज्यस्तरीय समिती छाननी करुन उच्चतम गुणवत्ता प्राप्त गाव, तालुका व जिल्हा यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी अंतिम निवड करेल. |